माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००३२१२**

**अपिलार्थी श्री. दत्ताराम पेडामकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
मा. मंत्री (वने) यांचे कार्यालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी**
मा. मंत्री (वने) यांचे कार्यालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.१०.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०८.२०२५ | | ०३.१०.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २३.१२.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. २९.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(१) आम्ही दि. २५.०८.२०२५ व १८.०८.२०२५ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील केलेली कार्यवाहींची प्रती मागीतली होती.*

*(२) महाराष्ट्र शासन वन विभाग मालकीची जागा इतर व्यक्तींना खरेदी करण्याचे दिलेले अधिकार असल्याचे व त्यांच्या ७/१२ मध्ये कूळ म्हणून फेरफार मध्ये इतर व्यक्तींची नोंद करत असल्याची नियमावली यांची प्रती द्यावी अथवा खुलाशांची प्रती मागीतली होती (सन १९९५ ते आजपर्यंत)*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०३.१०.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

..२/-

४. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही.

५. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

६. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह तसेच आजच्या सुनावणीस अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

6-10-2026

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०६.१०.२०२६

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००३२१२**
**अपिलार्थी श्री. दत्ताराम पेडामकर**
**सुनावणी दिनांक : ०९.१०.२०२६ (In continuation of order dt ०६.१०.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहित अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह तसेच आजच्या सुनावणीस अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी आयोगास सादर केले की, संबंधित जन माहिती अधिकारी हे मा. मंत्री महोदय यांच्यासोबत दौऱ्यावर असल्याने आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. तरी पुढील तारीख मिळण्याची त्यांनी आयोगास विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १४.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

Greater Mumbai

9-10-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०९.१०.२०२६**

निर्गमित
09 OCT 2026

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००३२१२**
**अपिलार्थी श्री. दत्ताराम पेडामकर**
**सुनावणी दिनांक : १२.१०.२०२६ (In continuation of order dt ०९.१०.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सादर केले की, संबंधीत जन माहिती अधिकारी हे मा. मंत्री महोदय यांच्यासोबत दौऱ्यावर असल्याने आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. तरी पुढील तारीख मिळण्याची त्यांनी विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात आली होती.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी आज कॅबिनेट बैठक असल्या कारणाने सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्याबाबत दिलगीरी व्यक्त करुन पुढील तारीख देण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २६.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : १२.१०.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 12-10-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**